# प्रकरण चौथे

## जे.पी.नाईक यांचे कोल्हापूरमधील इतर कार्य

## प्रकरण चौथे

### जे.पी.नाईक यांचे कोल्हापूर मधील इतर कार्य --

जे.पी.नाईक यांना नेहमी नवनवीन कल्पना सूचत. तर्‍हतर्‍हेच्या समस्या त्याच्या डोळ्यापुढे येत अशा कल्पना दुस-यांना सांगत. दुस-याची कल्पना चांगली वाटली तर ती स्वीकारत . प्रत्येक समस्येच्या मुळाशी जाणे व समस्येची सोडवणूक करणे हा त्याचा स्वभावच होता. यातच शास्त्रशुध्द नियोजन करुनच समस्येचे निराकरण करणे नाईकांना आवडे.

नाईक हे आपले म्हणणे सुशिक्षिताप्रमाणेच लेखताना पटवून देत. त्यामुळे लोकांचा नुकसान न होता त्याना भरपूर नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था ते नाईक करत. तसेच शहर सुधारणे बरोबर सर्व कार्यक्रमाविषयी लोकमत व जन-जागृती करण्याच्यादृष्टीने नाईक यानी प्रयत्न केले. सन १९४३ ते १९४६ या कालात शिक्षण,आरोग्य,रस्ता रुंदी ;वसाहती, सांस्कृतिक चळवळी या सुधारणाहाती घेऊन १२-१०-१९४३ ला पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका नाईकानी स्पष्ट केली.[१] फक्त अधिकारी म्हणून न वावरता सर्वसामान्यात मिसळले त्यामुळे कोल्हापूर संस्थानच्या महत्वाच्या जबाबदा-या पार पाडत असतानाही इतर कार्य करण्यात त्यानी यश संपादन केले. सुधारणा योजना, शिक्षण नियोजन या बरोबर त्यानी केलेले इतर कार्यही अत्यंत महत्वाचे आहे.

### जे.पी.नाईक यांचे कोल्हापूर मधील इतर कार्य --

अंबाबाईच्या देवळाच्या चारी दरवाजापासून रस्ते काढण्याची मोहिम जे.पी.नाईक यांनी हाती घेतली. देवळाच्या आवारात सुधारणा करण्याच्यादृष्टीने देवस्थान कमिटीकडून श्री.व्ही.टी.पाटील, श्री.एम.बी. लोहिया व श्री.जे.पी.नाईक यांची कमिटी नेमण्यात आली.या कमिटीमार्फत खालील महत्वाच्या सुधारणा करण्यात आल्या --

१) काशी व मनकर्णिका ही पाण्याची कुंडे अत्यंत अस्वच्छ झाली होती ती बुजवून टाकली, त्यापैकी मनकर्णिका कुंडावर बाग करण्याची योजना आखण्यात आली.

२) आवारातील फरशी वाकडीतिकडी व कमीजास्त लेव्हलची होती त्यावर सिमेंट क्रौंक्रिट ओतून संबंध आवारातील फरसी व्यवस्थित करण्यात आली.

३) दत्ताचे देवालयात तेथल्या गोसाव्याची एक मठी होती ती आवारात होती ती काढण्यात आली. काठी, ओवऱ्या व देवळांच्या जागासुध्दा पुजारी वगैरेनी आक्रमण केल्या होत्या ती सर्व आक्रमणे काढून आवार मोकळे करण्यात आले.

४) गरुड मंडपाच्या बाजूस दोन मोठे हौद होते त्यानी फार मोठी जागा व्यापली होती त्यापैकी दक्षिणेकडील हौद काढून टाकला. उत्तरेकडील हौद लहान करुन तो उत्तरेकडे सरकविला. या योगे दोन्ही बाजूला खूप मोठी जागा मोकळी झाली.

५) काही दुकाने आवारात मध्येच आली होती ती काढण्यात आली. रिकाम्या ओवऱ्याची जागा त्याना देऊन दुकानाची लाईन सरळ केली.[२]

शहर सुधारणा -

अ) शिक्षण --

कोल्हापूर नगरपालिकेत नाईक यानी प्रत्यक्ष कार्य सन १९४३ ते जुलै १९४६ जुलै अखेर सुमारे तीन वर्षे काम केले. या काळात आरोग्य, शिक्षण, रस्तारुंदी , वसाहती, सांस्कृतिक चळवळी अशा अनेक सुधारणा त्यानी केल्या. या सुधारणा करण्यामागील आपली भूमिका १२-१०-१९४३ ला एक पत्रकार परिषद घेऊन त्यानी स्पष्ट केली.

निरनिराळ्या योजना एका वेळी राबविल्या जातात. त्याचे कारण त्या एकमेकांस पुरक किंवा सहाय्यक असतात म्हणून उदा. वरुणतीर्थ बुजविणे हे काम रस्तारुंदीच्या पाडापाडीतून निघणाऱ्या भरीतून अनायासे होते. निरुपयोगी व घाणीच्या जागा मोकळ्या व स्वच्छ करुन घेतल्यास

आरोग्य साधले. शाळाची क्रीडांगणे करण्यास मोकळ्या जागा वापरता येतात. खर्चात बचत होते व बरीच कामे होऊन जातात.

शिक्षणाचा व्यापक अर्थ --

जे.पी.नाईक यांचे मते शिक्षणाची व्यापकता मोठी होती, मुलांना नुसते ज्ञान देऊन शिक्षण पुरे होत नाही.` ज्ञानाबरोबर मुलांचे आरोग्य पाहणे, त्याची आर्थिक क्षमता वाढविणे, त्याचे मन व व्यक्तिमत्व यांचा विकास करणे अशा अनेक विषयाकडे शिक्षणशास्त्रानी लक्ष पुरविले पाहिजे. शिक्षणाबरोबर अशा अनेक अंतर्गत प्रश्नांकडे त्यानी लक्ष पुरविले.[३] आपल्या नगरपालिकेमार्फत कार्य करावयाचे आहे. हे त्याच्या मनात प्रथमपासून होते म्हणून शहरातील एकूण विद्यार्थी एकूण शाळा त्यातील प्राथमिक आणि माध्यमिक किती, तसेच विद्यार्थ्यांच्या मानाने किती शाळा असायला हव्यात त्या कोठे असाव्यात वगैरेबद्दलच्या आकडेवारीसह सर्वांगीण अभ्यास जे.पी.नाईक यांनी आधिपासूनच केला होता. शिक्षणाच्या बरोबर शहरातील प्रत्येक सुधारणेचा अभ्यास त्यानी केला होता. यावर उद्याचे कोल्हापूर हे पुस्तक त्यानी प्रसिध्द केले.

जे.पी.नाईक याची शिक्षणासंबंधी सुधारणा करताना त्यामागे खालील विचार सूत्रे होती --

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व्हावयास हवे. या विषयावर धारवाड, पुणे, कोल्हापूर, बेळगांव या ठिकाणी डिसेंबर १९४१-४२ जानेवारी या काळात अनेक व्याख्याने दिली. प्राथमिक शिक्षण हे नुसते मोफत करुन भागणार नाही तर शिक्षण हे मुलांच्या दाराशी नेले पाहिजे म्हणजेच मुले आपोआप आकर्षित होतील. जेथे अपेक्षित व गरीब वस्ती आहे तेथे शाळा बांधल्या पाहिजेत अशी वस्ती शहराच्या सीमेवर ( out skirts ) काही विशिष्ट भागात होती हे नाईकांनी पाहिले व त्या धोरणाने शाळा बांधण्याचा कार्यक्रम त्यानी आखला. नाईकांच्या योजनेतील हे पहिले वैशिष्ट्य होय. मंगी वसाहतीजवळ ` दत्ताजीराव माने स्कूल `, राजारामपुरी पलिकडे शाळा नं.९, खोलखंडोबा जवळील शनिवारातील शाळा, रेसकोर्स नजीक ` ताराबाई विद्यालय `

रविवारातील शेलाजी वन्नाजी शाळा, अशी उदाहरणे या दृष्टीने सांगता येतील. अशा त-हेच्या शहराच्या वेगवेगळ्या भागात निदान आठ-नऊ नवीन शाळा सुरु करण्यात आल्या व काहीच्या योजना करुन ठेवल्या.

एकंदरीत बांधकामामध्ये म्हणजे स्थापत्यशास्त्रात नाईक यांना रस होता व गतीही होती. शाळा ईमारती कशा असाव्यात स्वस्त पण मजबूत बांधणी कशा प्रकारे होते इ.गोष्टीत म्हणजे प्रथम होणा-या प्लॅन्स व एस्टिमेट यात ते स्वत: लक्ष घालत.[४] व सुधारणा करीत. शिवाय बांधकाम सुरु झाले की त्या कामावर बहुतेक रोजची फेरी व तपासणी असायचीच साहजिकच कामास वेग येई.

मुलांच्या शिक्षणाचा विचार करताना त्याचे आरोग्यही राखायला हवे. मुलांना खेळायला बागडायला जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे म्हणजे आरोग्य व संवर्धन आपोआप साधते. प्रत्येक शाळेला लागून मोकळी जागा हवी, नवीन शाळांना परवानगी देताना, जागा मुबलक व मोठी पटांगणे मिळतील याची खबरदारी जे.पी.नाईक यांनी घेतली. शहराच्या भरवस्तीत असणा-या हायस्कूलसनाही वेगवेगळ्या रीतीने मोकळ्या जागा उपलब्ध करुन दिल्या. उदा. विद्यापीठाला जुन्या राजवाड्याचा भाग व राजाज्ञांची जागा, प्रायव्हेट हायस्कूलला खासबाग मैदानातील जागा, न्यू एज्युकेशन सोसायटीला पेटाळा, फिरंगाईची जागा, अशी नावे सांगता येतील. या योगे काहीना निव्वळ पटांगणेच मिळाली असे नाही तर ईमारतीचा भरपूर विस्तार करायलाही संधी मिळाली.

राजाराम कॉलेज लॉ कॉलेज या संस्थाना योग्य ठिकाणी स्वतंत्र जागा मिळायला हवी या मतानुसार जे.पी.नाईक यांनी तशा जागा त्यानी निवडल्याही होत्या. कालांतराने पुढे दोन्ही संस्था वेगळ्या जागेत गेल्याही. नाईक यांनी योजलेल्या ठिकाणी त्या गेल्या नसल्या तरी वेगळ्या ठिकाणी त्या हव्यात हे नाईकांचे मत मान्य झाले गेले.[५]

ईमारत फंड - गोळा करणेसाठी शिक्षण संस्था या सरकार स्थानिक स्वराज्य किंवा खाजगी सोसायट्या याच्यामार्फत चालविल्या

जातात. पण यामध्ये तिराईताची भूमिका न घेता सक्रीय सहकार्य केले पाहिजे अशी नाईकाचे मत होते. त्यानी श्रीमंत राणी ताराबाई प्राथमिक शाळा ईमारत फंड सुरु केला व हजारों रुपयाच्या देणग्या मिळविल्या. तसेच काही श्रीमंताच्याकडून संपूर्ण शाळेकरिता मोठ्या देणग्याही मिळविल्या. शेलाजी वन्नाजी स्कूल व दत्ताजीराव माने स्कूल या शाळा ईमारती अशा देणग्यातून बांधण्यात आल्या. नगरपित्यानी किंवा शिक्षण समितीच्या सभासदानी अशा देणग्या मिळविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत हाही धडा नाईक यांनी आपल्या वर्तनाने घालून दिला.

शहरातील प्राथमिक शिक्षण नगरपालिकेकडे सोपविले. २४-९-४२ खाजगी शाळांच्यादृष्टीने उपयुक्त असे ग्रँट इन कोड लागू करणे ( १-६-४३ ) प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट लागू करुन प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले.[६]

ट्रेनिंग कॉलेज बंद होते ते पुन: रुकडी येथे सुरु करण्यात आले.

२) शारीरिक शिक्षण --

प्राथमिक स्तरापासून ते उच्चस्तर माध्यमिक शाळा सर्व ठिकाणी शारीरिक शिक्षणाची सुरुवात केली.त्यासाठी कांदिवली येथील शारीरिक शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्यास अनेक शिक्षकांना सरकारी मदत देऊन पाठविले. कोल्हापूरच्या क्रीडाक्षेत्रात महनीय कामगिरीबद्दल प्रसिध्द असलेले श्री मेघनाथ नागेशकर यांना या कारणासाठी सन १९४५ साली नाईक यांनी मुंबईहून बोलावले व त्याना इन्स्पेक्टर व फिजिकल एज्युकेशन ऑफिसर या जागेवर नेमले.

कोल्हापूरात एकूण पाच क्रिडांगणे हवीत त्यापैकी वरुणतीर्थ हे त्यानी संपूर्ण तयार केले. रावणेश्वर बुजविण्याचे काम जारीने पुरे करुन कोल्हापूर संस्थानातील खेळाडूंना प्रतिनिधित्व मिळण्याच्यादृष्टीने नाईक यांनी प्रयत्न केले. सन १९४६ मध्ये अशा मैदानी स्पर्धात भाग घेण्यास कोल्हापूरचे संघ पाठविले गेले. त्याकरिता संस्थानातर्फे श्री.बा.रा.कोल्हटकर

यांना खेळाडूच्या बरोबर मुद्दाम पाठविण्यात आले होते.

कोल्हापूरातील तालमीच्या आखाड्याना मदत करण्यासाठी तालिमखाना ग्रँटस डिस्ट्रिब्यूशन कमिटी स्थापन करुन त्याकरिता मदत केली.७

सांस्कृतिक कार्य --

वाचनालय --

नगरपालिकेचे खास वाचनालय नव्हते.भास्करराव जाधव वाचनालय या नावाने सुसज्ज वाचनालय सन १९४४ मध्ये सुरु केले. या वाचनालयामार्फत पुढे वेगवेगळ्या विषयाच्या व्याख्यानमाला सुरु केल्या.केवळ स्त्रियांकरिता रेसकोर्स नजीक पद्माराजे वाचनालय सन १९४५ ला सुरु केले.

देवल क्लबला जागा --

संगीत कार्याला वाहिलेल्या देवल क्लब या जुन्या प्रसिध्द संस्थेस रीजन्सी कौन्सिलकडून संस्थे समोरचीच एक मोठी जागा नाईक यांनी देवविली. वाढत्या शहराच्यादृष्टीने क्लबचे हॉल लहान आहे त्यासाठी क्लबला मोठी जागा मिळाली पाहिजे, लगेच दुसरे दिवशी क्लबने करायचा अर्ज त्यानी स्वत:हूनच तयार करुन आणाला व संचालकाची सही घेतली. दोन ते तीन आठवड्यात केशवराव भोसले नाटयगृह ( पॅलेस थेएटर ) व क्लब यांच्या दरम्यानची विस्तीर्ण जागा क्लबला मिळाली. या जागेत राजाराम कॉलेजच्या टेनीस कोर्टची जागा होती ती काढून टाकण्यात आली.पॅलेस थिएटरच्या उत्तरेकडील रेलिंगपर्यन्त क्लबला जागा द्यायची म्हणजे तेथील चालू रस्ताच बंद होतो म्हणून एक दक्षिणोत्तर नवीन छोटा रस्ता काढला.पॅलेस थिएटरच्या पायऱ्या मध्यावर होत्या त्या क्लबला द्यावयाच्या जागेत येतात म्हणून त्या काढून पश्चिमेकडे सरकून घेण्यात आल्या.आणि हा सर्व खर्च दरबाराने केला. जे.पी.नाईक यांना या विषयी विचारता ते म्हणाले ' अहो, हा मी तुमच्यावर किंवा क्लबवर काही उपकार केला नाही.संगीत ही

माझ्या जीवनातील एक मोठी उणीव आहे. ती उणीव अल्पशी भरुन काढल्याची मला संधी मिळाली.तेव्हा मीच तुमचा ऋणी आहे.[८] अल्लादियाखाँसाहेब यांचा अर्धपुतळा देवल क्लब व ही जागा याच्या दरम्यान बसविण्यात आला.

वसाहती व मार्केट्स्

शहरामध्ये लोकसंख्येत वाढ, घराची गरज यामुळे शहरा बाहेर वस्ती नेल्याचा नाईक यांनी अनेक रीतीने विचार केल्याचे दिसून येते. शहरातील गरीब आणि शेतकरी पेशातील लोकांच्याकरिता शहराजवळच शालिनी पॅलेसच्या पिछाडीस एक आदर्श खेडे वसविण्याची योजना सन १९४५ च्या एप्रिलमध्ये जाहिर करण्यात आली.ती वर्षा- दोन वर्षात नाईक यांनी आमंलात आणली. ही योजना म्हणजे शहराच्या पश्चिमेकडील सध्याची फुलेवाडी वसाहत होय. गरिबांच्या सोईसाठी यातील प्लॉटस् तर प्रत्येकी दहा रुपये इतक्या स्वस्त किंमतीत विकण्यात आले. या वसाहतीचे दुसरे वैशिष्ट्ये हे की, ही वसाहत कोणत्याही विशिष्ट जातीकरिता नव्हती, तेथे सर्व जाती धर्माचे लोक आले. अधिकतर शेतकरी पेशाच्या लोकांनी या वसाहतीचा फायदा घेतला.

दुसऱ्या महायुध्दाच्या सन १९१८ च्या समाप्तीनंतर सैनिक हळुहळू परत येत होते. त्याच्या पुर्नवसनासाठी शहराच्या एकदम पूर्व टोकाला अत्यंत स्वस्त दरात प्लॉटस् देऊन एक वसाहत योजिली गेली.ती मुक्त सैनिक वसाहत या नावाने ओळखली जात आहे.

मध्यमवर्गीयांनी सहकार पध्दतीने गृहनिर्माण संस्था स्थापून वसाहती केल्या पाहिजेत हे मत नाईक यांनी मांडले. कोल्हापूरचे एक कल्पक नागरिक बाबूराव रुईकर यांनी त्या कल्पनेचा पाठपुरावा करुन हिंद को.ऑप. हौसिंग सोसायटी दि.६-५-४६ ला रजिस्टरही करुन घेतली. ही गोष्ट सार्वत्रिक व्हावयास हवी या धोरणाने दि.३०-५-४६ ला एक विस्तृत पत्रक काढून अशा सोसायट्या कोणत्या तत्वावर स्थापल्या जाव्यात हे नमूद

करण्यात आले. सरकारने लोकांना आवाहन करुन अशा सोसायट्या काढण्यास उद्युत करावे अशी सूचनाही नाईक यांनी केली.सरकारने ती योजना सन ३०-८-४६ ला मान्य केली.लगेच त्याची कार्यवाही सुरु झाली व हिंद को.ऑप.हौसिंग सोसायटीची एक वसाहत प्रथमत: स्थापन झाली.तिला तिच्या प्रवर्तकाचे नावाने रुईकर कॉलनी असे ओळखले जात आहे.

शहराच्या दक्षिणेला शाहू मिलपासून युनिव्हर्सिटीकडे जो रस्ता जातो.त्याच्या दोन्ही बाजूला ज्या अनेक वसाहती पुढे कालांतराने हळूहळू झाल्या.त्यापैकी ब-याच वसाहतीचे नियोजन नाईक यांच्या कारकिर्दीत झाले होते. शहरालगत बी वॉर्डमध्ये बेलबाग वसाहत सन १९४६ ला स्थापन करण्यात आली.

उद्यमनगर --

लहान मोठे उद्योगधंदे शहरातील दाट वस्तीत विखुरलेले होते,त्यायोगे नागरिकांना त्या धंद्यांचा उपद्रव व्हावयाचा असे धंदे करणा-याला जरुर तेवढी मोकळी व मोठी जागा न मिळाल्याने उद्योगधंद्याचीही कुचंबणा व्हावयाची याच्या निराकरणार्थ जितीच्या ओढ्यापलिकडील पूर्वभागातील शेती वगैरेची मोठी जागा ॲक्वायर करुन त्याचे सोईस्कर प्लॉट पाडून शहरातले लहानमोठे उद्योधंदे करणा-या लोकांना ते देण्यात आले. या वसाहतीस उद्यमनगर असे स्वतंत्र नाव दिले. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्र सरकारने पुढे एम.आय.डी.सी.या नावाने उद्योगधंद्याकरता अनेक मोठ्या शहरातून स्वतंत्र वसाहती केल्या,त्या पूर्वीच ती कल्पना कोल्हापूरात सन १९४५-४६ साली नाईक यांच्या प्रयत्नाने अंमलात आणली गेली.

गुळ मार्केट --

गुळाची पेठ शाहुपूरीत होती.कोल्हापूरात गुळाची उलाढाल मोठ्या प्रमाणात होत असल्याने गुळाच्या मोसमामध्ये शाहुपूरी लोकवस्तीचा बराचसा भाग आणि रस्तेसुध्दा या व्यापाराने व्यापले जात ही गोष्ट शाहुपूरीच्या

नागरिकांच्या आरोग्य व स्वास्थ या दृष्टीने इष्ट नव्हती.व्यापाऱ्याचीही योग्य जागेच्या अभावी कुंचबणा व्हावयाची म्हणून सन १९४६ च्या सुरुवातीस मार्केट अॅक्ट लागू करण्यात आला. त्याकरिता फार मोठी जागा पुणे बंगलोर रोडच्या दक्षिणेस अॅक्वायर करण्यात येऊन त्याचे प्लॉटस् पाडण्यात आले.कोणाचीही नवीन जागेत जाण्यास प्रवृत्त करण्यास नाईक यांनी पुढाकार घेतला.

गुरांचा बाजार --

हा नेहमी नदीकाठी भरायचा ती जागा अपूरी पडायला लागली. म्हणून शहराच्या दक्षिणेस एक सोईस्कर जागा त्या बाजाराकरिता निवडून त्यातील खाचखळगे बुजवून झाडे वगैरे लावून ती स्वतंत्र ठिकाणी नेण्याच्या दृष्टीने आखणी केली गेली.

आरोग्य --

शिक्षणाच्या खालोखाल नाईक यांना आरोग्य या विषयाचा जिव्हाळा होता.धारवाडच्या परिसरात त्यानी डॉक्टर म्हणून काम केले होते. तुरुंगात असताना आरोग्याचा अभ्यास केला.कोल्हापूरला नवीन हॉस्पिटल उभी करण्यास नाईक यांनी पुढाकार घेतला.

भंगी पॅसेज --

ही अभिनव योजना ताबडतोब जारीने हाती घेतली.शहराचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले होते की,शहराच्या अर्ध्याअधिक लोकांना संडासाची सोय नव्हती.साहजिकच लोक ठिकठिकाणी घाण निर्माण करीत,त्यावर तोडगा म्हणजे लोकांना अधिक संडास बांधायला प्रवृत्त करणे,भंगी पॅसेज योजनेच्या पाठीमागे ही कल्पना होती.

शास्त्रशुध्द नगररचनेत दोन मोठ्या रस्त्याच्या दरम्यान एक पिछाडीचा छोटा बोळ ठेवलेला असतो.कारण हे की दोन्ही रस्त्यावरील घरांना मधल्या छोटया बोळाकडे आपले संडास बांधता यावेत.कोल्हापूरची शहर रचना शास्त्रशुध्द नसल्याने बोळ नाहीत दोन्ही बाजूच्या घराची

परडी, एकमेकांना लागून असायची.त्यायोगे एकतर संडास बांधले जात नसत बांधल्यास ते हम रस्त्यावर शेजा-याच्या दाराजवळ येत यासाठी पिछाडीस परड्यातून एक नवीन बोळ काढण्याची योजना नाईक यांनी केली ही योजना नगरपालिकेतर्फे जाहिर केलेल्या एका पत्रकात नकाशासह तपशिलाने दिली होती. या योजनेची सुरुवात त्या वेळचे संस्थानचे मुख्यमंत्री ना.पेरी यांच्या अध्यक्षतेखाली २३-८-४३ रोजी समारंभपूर्वक करण्यात आली. जाहिर विनंती स्थानिक वर्तमान पत्रातून करण्यात आली.त्यावर पुढारी पत्राने दि.२८-४-४३ ला अग्रलेख लिहून या नवीन उपक्रमाची स्तुती केली व नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले. आणि पुढे खरोखरच असे घडून आले की लोकांकडून स्वत:ची जागा विनामोबदल्यात देण्याचे अर्ज येऊ लागले सुमारे ६० ते ७० गंगी पॅसेजीस काढण्यात आले.

बोळांची सोडवणूक --

शहर सुधारणेची रुढ पध्दती दोन त-हेची असते. एकतर शहराबाहेरच्या मोकळ्या जागा पाहणे तेथे नवीन वसाहत करणे. दुसरी पध्दत लहान असलेले रस्ते रुंद करणे पण शहरातील अंर्तभागात जेथे लहान लहान बोळांचे जाळे असते तेथे सहसा कोणी हात लावीत नाही कारण तसे करणे अनेक दृष्टीने कठीण असते. परिणामत: जुने शहर हे जुनेच राहते. नाईक यांच्यापूर्वी शहर सुधारणा करणा-यानी वरचेच दोन मार्ग अवलंबिले. नाईक यांनी दोन मार्गाचा अवलंब केलाच पण विशेष हे की त्यानी जुन्या शहराच्या समस्येला हात घातला.

कोल्हापूरात मोठे रस्ते सोडून आतल्या भागात बोळांचे जाळे आहे या ठिकाणी नाही भरपूर वारा नाही चांगला उजेड आणि वाहने जाऊच शकत नाहीत. सफाई कामगाराना डोक्यावरुन केरकचरा नेणे कठीण होते जो बोळ पांच फूटाचा होता तो १० ते १२ फूटाचा केला. १० ते १२ फूटाचा ते १७ ते १८ फूट केला. कोठे गराडे पाडले तर कोठे कट्टे पाडले. कोठे रिकामी जागा घेतली तर कोठे परड्याचा भाग घेतला म्हणजे जाचेल अशी पाडापाडी केली नाही. पण नुकसान भरपाईचीही बचत केली सारे कसे व्यवहार्थ पातळीवर केले. अनेक बोळास सुधारणा केल्या.

वरील कार्य नरजेस भरणारे नाही पण महत्वाचे होते.

## ताराबाई रस्ता —

अंबाबाई देवळाच्या चारी बाजूला दाट अस्वच्छ वस्ती झाली होती. हे चारी रस्ते रुंद होणे गरजेचे होते. पूर्वी असतीलही पण कालांतराने नागरिकांनी रस्त्याकरिता ठेवलेल्या जागावर हळूहळू अतिक्रमण केले. सन १९४५ मध्ये कोल्हापूर शहर सुधारणा समितीचे सचिव म्हणून कार्य करताना महालक्ष्मी मंदिर ते रंकाळा तलाव मध्य ताराबाई रोडची आखणी केली.[१] चारी दरवाज्या पैकी महादरवाज्याच्या समोर थेट रंकाळ्याकडे जाणारा जो रस्ता केला तो म्हणजे नवा ताराबाई रस्ता होय. हा रस्ता अनेक दृष्टीनी क्रांतिकारक असा मानायला हवा. पूर्वी येथे छोटेछोटे बोळ व वस्ती होती. रंकाळ्याकडे जायला एखादा अलग बोळही नव्हता म्हणून त्यातून जो ताराबाई रस्ता काढला ते नुसते रस्ता रुंदी प्रकरण नव्हते तर संपूर्ण स्वरुपाची योजना होती हा रस्ता आखण्यापूर्वी नाईक यांनी त्या भागाच्या नकाशाचा बारकाईने अभ्यास केला होता. अंबाबाईच्या नगारखान्यावरुन या रस्त्याचे कल्पनाचित्र ते न्याहळत होते, ज्याची घरे पूर्णपणे जाणार त्याच्याशी ते वाटाघाटी करत होते. चौदा घरे यात जाणार होती. शिवाय लहान मोठ्या पन्नास जागा संपादन कराव्याच्या होत्या. त्या सर्वांच्या पुनर्वसनाचा प्रश्न होता. नाईकांनी तो अतिशय कौशल्याने व समर्थपणे हाताळला.

५५ ते ६० फूट रुंदीचा व चार ते पाच फर्लांग लांबीचा झाला. काहीचे यात नुकसान झाले पण त्याच बरोबर या रस्त्याच्या दुतर्फाच्या सुमारे १०० मिळकतीना हमरस्त्यावर आणले गेले. घाण नष्ट झाली व रंकाळ्या वरील शीतल वारा भरवस्तीत आला. हा रस्ता पाडण्याचा समारंभ १६-१२-४३ रोजी कोल्हापूरचे बॅ.केळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. ज्याची घरे पडत नुकसान होई त्याना भरपूर मोबदला देण्याची सोय नाईक यांनी केली.

अंबाबाईच्या दक्षिण दरवाजा समोरील रस्ता जुन्या राजवाड्यापैकी कांही भाग पाडून करण्यात आला. राजवाड्याचा भाग पाडला जाणार असल्यामुळे कांहीनी काहूर माजविले पण नाईक यांनी त्याला जुमानले नाही. इतर नागरिकांप्रमाणे सरकारनेही त्यागाची तयारी ठेवली पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला व ही गोष्ट दरबार व राणी सरकार यांना पटली. अशी पाडलेली जागा विद्यापीठ हायस्कूलला देण्यात आली. पूर्व व उत्तर दरवाजा समोरील रस्त्यांची आखणी नाईक यांनी केली होती पण ही योजना ते सुरु करु शकले नाहीत.

ताराबाई रस्त्याबद्दल महत्वाचा आक्षेप घेतला गेला की तो रस्ता महादरवाजा समोर नीट पश्चिमेला काढला गेला नाही. शिवाय तो दोन तीन ठिकाणी थोडासा वाकडा झाला आहे हे आक्षेप बरोबर होते. महादरवाजाच्या निट समोर सरळ पश्चिमेकडे रस्ता काढला तर तो संध्यामठा जवळ जाऊन पोहोचला असता म्हणजे चौदा ऐवजी ६० ते ७० घरे किती तरी जागा गेल्या असत्या व खर्चाची बाब होती. घरवाल्याचे सहकार्य मिळाले नसते. या रस्ता रुंदीकरण मोहिमेमुळे खंबाळे तलाव व पाटणकर वाड्यापाठीमागील रिकामी जागा या दोन मोठ्या सोईच्या जागा मिळाल्या. शिवाय रंकाळ्यास जाऊन मिळणारा अधिकाअधिक जवळचा रस्ता म्हणजेच सध्या काढलेला रस्ता होय. कोणतीही योजना केवळ आदर्श कल्पना डोळ्यापुढे ठेवून करता येणार नाही. ती व्यवहार्य कशी होईल हे अगत्याने पाहिले पाहिजे. वेगवेगळे तज्ज्ञ बोलविले तरी त्यांच्या आहारी मात्र जे.पी.नाईक गेले नाहीत.

सुभाष रस्ता, साठमारी मैदाना शेजारुन जानारा हुतात्मा पार्क कडून पूर्वेकडे जाणारा मोठा रस्ता, शाहुपूरीतील कलेक्टर कचेरीकडे जाणारा असेंब्ली रोड, पूर्वीच्या शिवाजी थिएटरवरुन दक्षिणेस पाण्याच्या खजिन्याकडे जाणारा महाद्वार रस्ता हे आणखी काही महत्वाचे रस्ते नाईक यांच्या योजनेतील महत्वाचे टप्पे म्हणून नमूद करता येतील. १०

तळी --

कोल्हापूर शहर म्हणजे काही तळ्याचे शहर होय. शहराच्या विस्ताराच्या किंवा आरोग्यादृष्टीने यापैकी काही तळी शहराच्या पूर्वीच्या शिल्पकारांना हळूहळू बुजवावी लागली. नागरिकांचा दरवेळी विरोध व्हायचा पण नाईक यांचा निर्मळपणा व कामाचा झपाटा सर्वसाधारण नागरिकांना पटला होता. उदा. कपिलतीर्थ, वरुणतीर्थ दोन्ही तळी बुजविण्यात आली. वरुणतीर्थ तसे बुजविण्यास ४-९-४३ ला सुरुवात झाली. संपूर्ण बुजवायला लागणारा मराव मुद्दाम आणला नाही. रस्तेरुंदीत घरांच्या पाडापाडीतून जो मराव निघत होता त्याचा वापर करण्याचे ठरले. तळ्यातील पाणी बाहेर काढण्याचा प्रश्न अडचणीचा होता. त्याकरिता दक्षिणेत पाट काढून उत्तरेकडे गावधरीत पाणी सोडण्याची योजना होती तसे सोडण्यास प्रारंभ श्री दुधगावकर वैद्य यांच्या हस्ते रितसर पूजा करुन झाला. पाणी सोडण्यासाठी वाट काढून देण्यात आली. यावेळी चित्तथरारक घटना घडली. संध्याकाळपर्यन्त वाहत्या पाण्याचा जोर वाढत जाऊन प्रचंड प्रमाणात पाणी वाहू लागले व तळ्याच्या उत्तरेकडील रस्त्याच्या पलीकडे काही घरे वाहून जाणार की काय असा गंभीर धोका निर्माण झाला. या घरांच्या संरक्षणार्थ म्युनिसिपल कामगार, पोलिसदल वगैरेची मदत जमविण्यात आली. जे.पी.नाईक तेथे एकदा जे सायंकाळी गेले ते दुसऱ्या दिवशी मध्यान्ही पर्यन्त पाण्याचा धोका कमी होईपर्यन्त सारखे उभे होते. अखेर धोका टळला. फक्त एक घर वाहून गेले हे तळे रिकामे झाल्याने दहा एकरावर जागा नवीन उपलब्ध झाली व तेथे मोठे क्रीडांगण झाले. म.गांधीचा पुतळा बसविण्यात आला. तळ्यामोवती काही संस्थाच्या ईमारती झाल्या व मुख्य म्हणजे तळ्यातील पाणी सारखे झिरपून उत्तरेकडील जो साकोली माग सारखा दलदलीचा झाला होता तो कायमचा कोरडा झाला व वसाहत वाढली.

रंबाळा हे मध्यवस्तीतले दुसरे तळे नाईक यांनी बुजविले. हे कोट मागातील घाणीचे केन्द्रस्थान होते. ताराबाई रस्ता या तळ्याजवळून काढला. त्यादृष्टीने ताराबाई रस्त्याचा मराव टाकायला सोय होण्यासाठी हे तळे

बुजविण्यात अग्रक्रम देणे, जरुरीचे होते. भरवस्तीत भरपूर जागा उपलब्ध झाली असती किंमत फार येणार नाही वाटले पण १९४६ सालातही लिलावात पंचावन्न हजारावर रक्कम मिळाली. सरस्वती व लक्ष्मी ही जोड चित्रपटगृहे व शेजारची मैदानची खुली जागा खंबाळे तलावाची देणगी होय.[११]

रंकाळ्यावरील राजघाटावरुन वाहने जात येत होती त्यामुळे फिरावयास येणाऱ्यास धुळीचा त्रास होत होता म्हणून राजघाटाच्या दोन्ही बाजूस आडवे कट्टे बांधून तो रस्ता रहदारीस बंद करण्यात आला. बागा व क्रीडांगणे यासाठी योजना आखण्यात आली व हुतात्मा पार्क ही जागा या पैकीच होय.

पाणी पुरवठा --

पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठी शहराच्या पश्चिमेला चंबूखडी नावाच्या ज्या टेंकड्या आहेत त्यापैकी एकीवर पाण्याचा मोठा खजिना बांधण्यात आला.त्या पाठीमागे नदी आहे तेथून पाणी खेचून फिल्टरिंग स्टेशनमध्ये आणून ते शुध्द करुन या खजिन्यात पंपाने चढविण्यात आले व या खजिन्यातून म्हणजे उंची वरुन मोठ्या दाबाने ते शहरात देण्यात आले.

हॉस्पिटल --

कोल्हापूरातील सी.पी.आर.हॉस्पिटल शहराच्या वस्तीत अपुरे पडत होते म्हणून एक मोठे तीनशे खाटाचे सुसज्ज असे हॉस्पिटल बांधण्याची योजना डॉ.सिमेन्स या तज्ज्ञ डॉक्टराच्या सल्याने नाईक यांनी केली. रेल्वे स्टेशनच्या पहिल्या गेटपासून दुसऱ्या गेटपर्यन्त जाणाऱ्या रेल्वे लाईनच्या उत्तरेस एक विस्तीर्ण जागा निश्चित करुन आणि कपाऊंट वॉल बांधून घेऊन आणि काही ईमारतीचे पायेही भरण्यात आले. पण नाईक यांच्या नंतर इतर योजनेप्रमाणे या योजनेची वाट लावण्यात आली.

## शिक्षण प्रसार --

शिक्षणाच्यादृष्टीने विचार करता तेथे प्राथमिक शाळा नाहीत तेथे त्या काढणे, शाळांना स्वत:ची ईमारत बांधून देणे, शाळांच्या भोवती मोकळी जागा उपलब्ध करुन देणे इत्यादी कार्यक्रमांना नाईक यांनी वेगवेगळ्या त-हेने चालना दिली. पद्माराजे प्राथमिक शाळा ईमारत निधी, म्हणून एक निधिला श्री व्ही.टी.पाटील यांनी सुरुवात केली होती.त्या निधीला नुसत्या पैशाच्या रुपाने नव्हे तर जमिनी अगर जागा या स्वरुपातही देणग्या मिळविण्यात आल्या. यात गावक-यांचा सहभाग केला गेला.गावामध्ये वसाहती निर्माण करण्यासाठी गावालगतची जागा संपादन करुन तेथे ब्लॉक्स पाडण्यात आले. गडहिंग्लज वसाहत हे एक त्यापैकी उदाहरण होय.

## राधानगरी धरण --

शाहु महाराजांच्या कारकिर्दित राधानगरी जवळ भोगावती नदीवर एक लहानसे धरण बांधून पाणी अडवीण्याचे काम झाले होते पण ते काम अर्धवट राहिले होते. धरणातून कालवे काढणे हे सर्वांचे काम होते.धरण उंच करुन वीज निर्माण करण्याच्या प्रश्नात दोन अडचणी होत्या.वाढलेल्या धरणाचे पाणी घाटाखाली पाडून वीज निर्माण करायची म्हटली तर विजेचे उत्पादन फार मोठे होणार असले तरी पाण्याचा फायदा कोंकणास म्हणजे संस्थानाबाहेर मिळणार होता, पाणी कोल्हापूरकडे पाडण्यात उंची कमी मिळून वीज निर्मिती फार थोडी होणार होती मात्र पाणी कोल्हापूरच्या भागास मिळणार होते.

२० ते २२ वर्षे अपु-या राहिलेल्या या प्रश्नाला चालना देण्यात नाईक यांनी पुढाकार घेतला.[१२] पी.के.शिंदे व एम.बी.टी.नारायण या दोन तज्ज्ञ इंजिनियरांच्या सल्लामसलतीने कोल्हापूरकडे पाणी पाडण्याची कल्पना मंजूर करण्यात आली.त्याकरिता मुळच्या ४० फूटाच्या धरणाची उंची १३० फूटापर्यन्त वाढविण्याचे ठरले.तेवढया उंचीवरुन मिळणा-या पाण्याच्या

जोरावर वीज उत्पादन करायचे ठरले. धरणातून वाहणारे पाणी नदीच्या मार्गे कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेपासून पूर्वेस शिरोळ पर्यन्त जात असल्याने नदीच्या दोन्ही तीरावरच्या लोकांना शेतीसाठी पाणी मिळणार होते व कोल्हापूर शहरास जादा पाणी पुरवठा या योजनेने होणार होता. नदीकाढच्या पंपाना व गांवाना वीज मिळणार होती त्यामुळे राधानगरी धरण योजना जिल्हाला वरदान ठरली.

जे.पी.नाईक व ग्रामीण सुधारणा --

कोल्हापूर शहराबाहेर म्हणजे संस्थानच्या इतर ठिकाणी विशेषत: खेड्यापाड्यातून नाईक यांनी खूप काम केले. प्रजापरिषदप्रणित बॉडी-नगरपालिकेत निवडून आली तेव्हा पहिल्या सभेत आपला राजीनामा सादर करताना, आपल्याला खेड्यामध्ये काम करण्यासाठी मोकळीक द्यावी असे आवाहन त्यानी केले होते पण त्याचा राजीनामा स्वीकारला गेला नाही.

ग्रामीण भाग व त्याची सुधारणा याकडे नाईक यांचा विशेष ओढा होता. बालपण खेड्यात गेल्यामुळे त्या जीवनाबद्दल त्यांना आत्मचिंता होती. खेड्यात शाळा सुरु केल्या.आपल्या डॉक्टरी ज्ञानाचा त्यानी तेथील लोकांना लाभ दिला. नाईक तेवढ्यावरच थांबले नाहीत. रस्ते,पाणी, शाळा,ईमारती,वाचनालये अशा अनेक ग्रामीण सुधारणा ते आपल्यापरीने तेथे करीत होते. गावच्या सुधारणा शक्यतो गावक-यानीच केल्या पाहिजेत. निदानपदरी अशा कार्यामध्ये गावक-यांनी सहभाग केला पाहिजे. सरकारी किंवा निमसरकारी मदतीवर सर्वस्वी अवलंबून राहता कामा नये अशी वृत्ती गावक-यामध्ये नाईक रुजवित होते. श्री.व्ही.टी.पाटील यांच्यासारखे कर्तबगार व शिक्षण प्रेमी गृहस्थ यावेळी इलाखा पंचायतीचे अध्यक्ष होते.त्याच्या अध्यक्ष पदाच्या कारकिर्दित शहराच्या सुधारणा नाईक यांनी हाती घेतल्या, ते दत्ताजीराव माने, पंचायतीच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष होते. म्हणून या दोघांच्या मदतीने व सरकारी मदतीने नाईक यांनी खेड्यात

स्वत:च्या जबाबदारीवर घेऊन काम केले. कामाला वेग आणणे, नवीन कामे सुरु करणे, नवीन उपक्रम सुरु करणे, नवीन प्रथा व वळणे लोकांच्या गळी उतरविणे असे विविध काम केले.

शेती सुधारण्याच्यादृष्टीने डेव्हलपमेन्ट खात्यातर्फे नाईक यांनी योजना तयार केली. साधारणत: ४० ते ४५ खेड्यांचा एक गट करुन त्याचे विभाग करण्यात आले. अशी सुमारे २५ केन्द्रे स्थापन करण्यात आली. त्या प्रत्येकावर एक डेव्हलपमेन्ट सुपरवायझार व एक ग्रामसेवक असायचा हे ग्रामसेवक सरकारी नोकर, हुशार पेन्शनर्स, स्काऊट कार्यकर्ते अशातून घेतले गेले. त्यानी वेगवेगळ्या विषयाचे महिनाभर प्रशिक्षण दिले. गावचे रस्ते, हमरस्त्याला मिळणारे जोड रस्ते, सहकारी सोसायटी, विहिरी अगर पाण्याची सोय वगैरे विविध त-हेची ग्रामोपयोगी कामे त्याच्याकडे सोपविली असायची या सर्वात एक महत्वाचे तत्व म्हणजे प्रत्येक सुधारणेत कार्यक्रमात गावक-यांचा सहभाग, अंगमेहन व पैसा यापैकी काही भाग हवाच होता. रोजच्या रोज सर्वांनी एकत्र यावे व काम करावे असे त्याना वाटे. मौनी विद्यापीठ प्रकाशनातर्फे ग्रामीण विकासाची माहिती देण्यासाठी ग्रामीण शिक्षण हे मासिक जे.पी.नाईक यांनी सुरु केले.

महारोग्याची वसाहत --

महारोग्यावर औषधोपचार करण्याची सोय कोल्हापूरात ब-याच वर्षापासून उपलब्ध होती पण महारोग्याचा प्रश्न हा त्याच्यावर केवळ औषधोपचार करुन सुटत नाही. वैद्यकीयदृष्टया त्या रोगातून रोगी मुक्त झाले तरी त्याच्या शरीरावर जी व्यंगे उत्पन्न झालेली असतात (उदा.बोटे झडणे इ.) ती कायमच राहातात त्यायोगे ब-या झालेल्या महारोग्याना समाज सामावून घेण्यास तयार नसतो ते सर्वथा उपेक्षित व समाजापासून दूर राहातात म्हणून महारोग्यांचा प्रश्न त्याची पुनर्वसणाची सोय करुन सोडवावा लागतो असा प्रयत्न हिंदुस्थानात प्रथम सन १९३६ साली दत्तपूर ( वर्धा येथे झाला ) पुढे सन १९४९ मध्ये वरोडा येथे बाबा आम्टे यांनी तो प्रयोग मोठ्या प्रमाणावर आदर्शवत केला व त्याना जागतिक किर्ति मिळाली.[१३]

वरोडा प्रयोगापूर्वी नाईक यांनी डॉ.सिमेन्स यांच्या मदतीने हा प्रयोग कोल्हापूरात महारोग्यासाठी दवाखाना असलेल्या `शेंडा पार्क` या भागात करण्याचे ठरविले.त्याकरिता एकूण ५६२ एकदारचे क्षेत्र बाजूला काढले,त्या ठिकाणी वैद्यकीय मदती घेरीज रोगी लोकांची राहाण्याची सोय,त्यांच्या मुलांसाठी शाळा,वाचनालय वगैरे सुविधा केल्या.त्यांच्या वसाहतीला उत्पन्नाची सोय व्हावी व महारोग्यांना उद्योगधंदा मिळावा या दृष्टीने शेती,डेअरी,पोल्ट्री,मेढपाळ, सूतकताई, कंगवे,बटणे,स्वेटर्स तयार करणे, सुतारकाम व शिलाई इ.सुविधा निर्माण केल्या. काही कालमर्यादेत तेथे सुमारे ४०० महारोग्याचे एक आदर्श खेडे निर्माण करावयाची नाईक यांची व्यापक योजना होती. नाईक यांच्या पश्चात अनेक योजना अपुऱ्या राहिल्या मागे पडल्या.

कोल्हापूर शहरा बरोबर आसपासचा भागही सुधारला जावा. ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या लोकांना नवीन ज्ञान, नव्या योजना याचा लाभ व्हावा. सर्वसामान्य जनतेच्या सुखसोई कशा करता येतील या दृष्टीने जे.पी.नाईक हे सतत प्रयत्नशील होते.

## संदर्भ ग्रंथ सूची


१ चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर, १९८१
जानेवारी-मार्च, १९८२, पृ.११५

२ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७४-७५

३ जोशी बाबूराव - ,, पृ.३७

४ जोशी बाबूराव ,, पृ.३८

५ चित्रा नाईक - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर, १९८१,
जानेवारी-मार्च १९८२, पृ.११६

६ माळी मा.गो.-सातवेकर अरविंद - एक देवाघरचं लेणं - पृ.२५

७ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.८०

८ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.४२

९ माळी मा.गो.सातवेकर अरविंद - एक देवाघरचं लेणं - पृ.२६

१० नाईक चित्रा - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१
जानेवारी -मार्च १९८२, पृ.१२१

११ नाईक चित्रा - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१
जानेवारी-मार्च १९८२, पृ.१२१

१२ नाईक चित्रा - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर, १९८१
जानेवारी-मार्च १९८२, पृ.१२३

१३ नाईक चित्रा - शिक्षण आणि समाज - ऑक्टोबर-डिसेंबर १९८१
जानेवारी-मार्च १९८२, पृ.


••